# काय कामाची असली जवानी?

काय कामाची असली जवानी।
शौर्य नाही जयाची निशानी ॥धृ॥

खाणे पिणे जीणे नाही फक्त।
कामी लागावे सळसळते रक्त।
पराक्रमी योद्धे देशभक्त।
भोगमुक्त त्यागी अनसक्त।
असा इतिहास ज्याचे ना ध्यानी ॥१॥

जिथे धिंगाणा घालतात गुंड।
अंध होऊन बसणार का ठंड।
असता क्रांतीचे पेटलेले बंड।
नाही स्फुरणार कसले हे दंड।
मुकी लाचार होईल वाणी ॥२॥

अब्रु बहिणीची उघड्यावर जावी।
फौज तरुणांची निर्बळ का व्हावी।
बाजु शोषित पीडितांची घ्यावी।
भाड श्रीमंताच्या घरची खावी।
मनगटी कर्तव्याचे ना पाणी ॥३॥

भ्रष्टाचाराचा माजलेला बोका।
अन्यायाने केले त्रस्त लोका।
देश बुडव्यांचा देशाला धोका।
निधड्या छातीने यापुढे रोका।
अशी डोळ्याने बघता कहाणी ॥४॥

दूर सारूनि जीर्ण जुन्या रुढींना।
पुढे या सारे आजच्या घडीला।
नौका देशाची नेण्या धडीला।
उभारा नव भारताची गुढी या।
श्याम शौऱ्याची गाईल गाणी ॥५॥

काय कामाची असली जवानी।